
APPLIED
HISTORY
APPLIED
HISTORY

# उपयोजित इतिहास सेमिस्टर 2
# प्रकरण १ — प्रसार माध्यमे आणि उपयोजित इतिहास

**अ) प्रसार माध्यमे :**

प्रसार माध्यम म्हणजे मानवी जीवनास लागणारी उपयुक्त माहिती संबंधीत माध्यमामार्फत पुरविणारे माध्यम म्हणजे प्रसार माध्यम.

आधुनिक जग हे माहितीचे युग आहे. जगाच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य माणूस देखील अत्याधुनिक माहिती व ज्ञानाने संपन्न असणे महत्त्वाचे आहे त्याला देशातील व जगातील सर्व चालू घडामोडी विषयीची अद्ययावत माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे व अत्यावश्यक आहे. त्याला ही अद्ययावत माहिती असेल तरच तो जबाबदार नागरिकाची भूमिका चांगल्या प्रकारे निभावू शकेल. त्यामुळेच जगात प्रसारमाध्यमे ही मानवी जीवनातील अविभाज्य घटक बनली आहे. २१ वे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या तंत्रज्ञानाच्या युगात प्रसार माध्यमांना मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रसार माध्यमांचा हेतू अत्यंत स्पष्ट व पारदर्शी आहे, तो म्हणजे सर्व जनसामान्यांना माहिती देणे, ज्ञान मिळवणे, शिकणे व शिकवणे याचबरोबर मनोरंजन करणे हा आहे.

**प्रसार माध्यमांचे प्रकार :**

१) मुद्रीत माध्यमे २) इलेक्ट्रॉनिक माध्यमे ३) नव माध्यमे

प्रसार माध्यमांचे मुख्य तीन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे

१) मुद्रीत माध्यमातः दैनिक वर्तमानपत्रे, साप्ताहिके, सायं दैनिक, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, अर्धवार्षिके, वार्षिके, अनियत कालिके, ग्रंथ इत्यादीचा समावेश करता येऊ शकतो.

२) इलेक्ट्रॉनिक माध्यमात आकाशवाणी, दूरदर्शन, व्हिडीओ, सी.डी., वृत्तवाहिन्या, महाजाल (इंटरनेट) अनुदिनी (ब्लाग) इ. समावेश करता येतो. ३) नव माध्यमात जाहिरात, जनसंपर्क, प्रसिद्धी प्रचार व पत्रके, व प्रतिमा तयार करणे इ. समावेश करता येतो.

**मुद्रण कलेचा शोध :**

कागद आणि मुद्रणाच्या शोधामुळे देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर क्रांती झाली. जनतेत जागृती निर्माण झाली. व विकासाचा मार्ग मोकळा झाला. मुद्रण या कलेच्या क्षेत्रातील लोक एकत्र आलेत. मुद्रण प्रारंभी एक कला होती. आज मुद्रणतंत्रात मोठ्या प्रमाणावर शोध लावण्यात आले आणि मुद्रण कलेने मोठ्या प्रमाणावर क्रांती घडवून आणली. मुद्रणतंत्राचा वापर आज ज्ञान-विज्ञान व मनोरंजनासाठी मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.

योग्य अशा पृष्ठभागावर दाब देऊन रंगद्रव्याच्या सहाय्याने अक्षरे किंवा चित्र उमटविणे किंवा त्याच्या प्रती काढणे यास मुद्रण असे म्हणतात. कापड, कागद, कातडी, पत्रा, प्लॅस्टिक इत्यादीवर मुद्रण केले जाते. मुद्रण करण्याचे तंत्र आणि पद्धतीच्या सुविधा मुद्रणालयात उपलब्ध असतात.

मुद्रण कला उदय व विकास, महत्त्व : कागदाचा शोध सर्वप्रथम चीनमध्ये लागला. कागद व शाई मुद्रणासाठी महत्त्वाची आहे. हे दोन्ही घटक चीनमध्ये होते. मात्र मुद्रण खिळ्यांची निर्मिती चीन देशात झाली नाही. जर्मनीतील जोहान्स गुटेनबर्ग याने इ.स. १४३६ मध्ये मुद्रणाचा शोध लावला. त्याने अक्षरांचे खिळे धातुच्या सहाय्याने तयार केले व मुद्रणात या खिळ्यांचा वापर केला. जर्मनीतील मेंझ शहरात त्याने मुद्रणालय काढले व छपाईला सुरूवात झाली. त्यामुळे

जोहान्स गुटेन बर्ग साला मुद्रणाचा जनक म्हणून जगात ओळखला जाते. हा शोध लागण्याआधी मुद्रण अक्षरासाठी (टाईप) चिकनमाती लाकूड व शिसे यांचा वापर केला जात होता. परंतू जोहान्स गुहेनबर्गने सहजगत्या हलविता येतील अशा खिळयांच्या अक्षरांचा वापर मुद्रणात केला. मेंझ हे त्याचे जन्मगाव होते येथेच त्याने स्वतःचे मुद्रणालय काढले. इ.स. १४५६ मध्ये त्याने त्याच्या मुद्रणालयांत बायबल या धर्मग्रंथाची छपाई केली. अक्षरांचे खिळे, कागद व शाईसाठी जर्मनीतील मेंझ शहर देश-विदेशात प्रसिद्धीस पावले. याचवेळी चिनचा कागद १४ व्या शतकात सर्व देशात जाऊन पोहचला होता त्यामुळे कागदावर सर्वत्र छपाई सुरू झाली होती.

चिनी भाषेत चित्र लिपीचा वापर होतो. चिनी भाषेच्या चित्रलिपीत सुमारे ऐंशी हजार अक्षर चिन्हांचा वापर केला जात होता. त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येत अक्षर खिळयांची छपाईसाठी निर्मिती करणे कठीण काम होते त्यामुळे चिनमध्ये कागद व शाई असून देखील मुद्रण कलेच्या क्षेत्रात चिन देशाची प्रगती होऊ शकली नाही.

औद्योगिक करणाबरोबर मुद्रण कलेच्या क्षेत्रात प्रगती झाली आणि इ.स. १४५७ पासून रंगीत छपाईला सुरूवात झाली. मुद्रणालयात सुरूवातीच्या काळात जोहान्स गुटेनबर्गने तयार केलेल्या अक्षरांचा प्रामुख्याने वापर होत होता पुढे मुद्रणतंत्रात विविध बदल होऊन रंगीत छपाईची सुरूवात झाली. त्यानंतर प्रतिमांचा वापर होऊ लागला त्याला प्रिंटींग स्पेस असे म्हणत होते. मुद्रणालयात मुद्रणासाठी प्रिंटींग रोलचा उपयोग होऊ लागला व त्याच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात साहित्य छापायला मदत होऊ लागली. कालांतराने मुद्रण कलेत नवीन शोध लागल्यामुळे मुद्रणालयांत ऑफसेट प्रिंटींग, लेजर प्रिंटींग, डिजिटल प्रिंटींग आणि २१ व्या शतकात थ्रीडी प्रिंटींग इत्यादी नव्या आधुनिक तंत्राचा उपयोग होऊ लागला. त्याचबरोबर मुद्रणासाठी आज प्रामुख्याने संगणक आणि अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर होत आहे. संगणकामुळे छापण्याचा वेग वाढला असल्यामुळे दर तासाला हजारो लाखांवर प्रती छापणारी मुद्रण यंत्रे ऑफसेटच्या रूपाने देश-विदेशात विकसीत झालेली आहेत.

**भारतात मुद्रणालयांची सुरूवात :**

इ.स. १४९८ मध्ये वास्को-द-गामा हा पोर्तुगीज प्रवासी भारतातील कोझीकोडे-कालिकत-केरळ राज्यातील बंदरात दाखला झाला. त्यानंतर पोर्तुगीजांनी गोवा राज्यात पहिले मुद्रणालय सुरू केले. बुस्तामांती हा युरोपातून छपाईयंत्र घेऊन भारतात गोव्याला स्थायिक झाला व तेथेच त्याने इ.स. १५५६ मध्ये पहिले मुद्रणालय (छापखाना) सुरू केले. पोर्तुगीज भारतात पश्चिम किनाऱ्यावर स्थायिक झालेत. त्यांनी मुद्रणालय सुरू केले व ग्रंथ छापण्यात सुरूवात केली. परंतु भारतातील सत्ताधारी राजांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले असे मत जेष्ठ इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर यांनी नोंदविले आहे. भारतात ब्रिटीशांनी आणि फ्रेंचांनी मुद्रणालयाची सुरूवात केल्यावर भारतीय गावांत मुद्रण खिळे बनवण्यात येऊ लागले. हे देवनागरी लिपीतील मुद्रणखिळे चार्लस् विब्किन्स यांनी तयार केलेत. त्यांनी हुगळी बंगाल प्रांतात छापखाना काढला. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांनी गुजराथी व्यापारी भीमजी पारेख मार्फत एक मुद्रणयंत्र आणले होते. भीमजी पारेख यांनी

देवनागरी लिपीतील अक्षरांचे खिळे तयार करण्यासाठी हेन्री या पाश्चिमात्य कारागिराचे सहाय्य घेतले होते. त्याचप्रमाणे धर्मप्रसारकांनी वसाहतीच्या भागात छापखाने सुरू केले होते. या छापखान्यातून धार्मिक साहित्याची छपाई मोठ्या प्रमाणात केली त्यामुळे त्यांना धर्मप्रसार करणे सोईचे झाले. डॉ. विल्यम कॅरी हे इंग्लंड मधील धर्म प्रसारक होते. त्यांनी मालदा पश्चिम बंगाल येथे चर्चची स्थापना केली. भारतातील लोकांशी त्यांच्या भाषेतून संवाद साधता यावा म्हणून त्यांनी भारतातील विविध भाषांचा अभ्यास केला. त्याचबरोबर त्यांनी डचांच्या वर्चस्वाखाली कलकत्या जवळील सेरामपूर येथे छापखाना काढला. त्यांनी बरेच मराठी ग्रंथ छापले. ते कलकत्याला फोर्ट विल्यम महाविद्यालयात मराठी भाषेचे प्राध्यापक होते. त्यांनी इ.स. १८१० मध्ये इंग्रजी मराठी शब्दकोश प्रसिद्ध केला होता. त्यांनी सुमारे चाळीस भाषातून सुमारे ९० ग्रंथ प्रसिद्ध केलेत. त्याचप्रमाणे इ.स. १८१६ मध्ये गुजराथी भाषेतून सुरूतला मुद्रणाची स्थापना झाली तर याच वर्षी मादणकोर येथे मल्याळममधून मुद्रणाची सुरूवात झाली. १९ व्या शतकाच्या मध्यावधीत भारतीय भाषेतून भारतात अनेक कारखाने सुरू झालेत. सरफोजी राजे भोसले यांनी मराठी मुद्रणालय मिशनच्या सहकार्याने तंजावर येथे सुरू

केले. या छापखान्यालाच 'तंजावरचे मराठी मुद्रणालय' असे संबोधले जात होते. परंतु या मुद्रणालयाचे नाव नवविधा कला निधी याप्रमाणे होते. भारतातील विविध प्रातांच्या अनेक देवनागरी भाषेतील मुद्रणालयाच्या कामी डॉ. विल्यम कॅरी यांचे प्रयत्न व योगदान भारतात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

मुंबई प्रांतात मुद्रणालयाची सुरूवात : इ.स. १७९० मध्ये मुंबई प्रांतात बॉम्बे गॅझेट आणि कुरियर या नावाची दोन मुद्रणालये म्हणजे छापखाने सुरू झालेत. या मुद्रणालयात प्रामुख्याने रोमन लिपीचा उपयोग केला जात होता. कुरियर या नावाच्या मुद्रणालयात मराठी भाषेतील पंचो पाख्यान हा ग्रंथ छापण्यात आला. त्यावेळी मुंबई प्रांताचा माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा गव्हर्नर होता. खर तर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टने मुंबई प्रांतात मुद्रणालये सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. इ.स. १८३० ते इ.स. १८४० या दहा वर्षात १) मुंबई समाचार २) अमेरिकन मिशन ३) चाबूक ४) दर्पण ५) प्रभाकर असे पाच मुद्रणालये सुरू झालीत. या मुद्रणालयाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नियतकालीकाच्या नावावरून मुद्रणालयाची नावे प्रचलीत होती. त्याचप्रमाणे इ.स. १८३०-३१ मध्ये मुंबई बाहेर म्हणजे पुण्यात विश्रामबाग वाड्यात शिळाप्रेस छापखान्याची मुहुर्तमेढ झाली. पुण्यात नारो अप्पाजी गोडबोले या गृहस्थाने अत्यंत

निर्दोष आणि आकर्षक पद्धतीने छपाई करण्यास सुरूवात केली. जावजी दादाजी चौधरी यांनी पुण्यातच निर्णय सागर या नावाने छापखाना काढला आणि कालांतराने तो खुपच प्रसिद्धीस पावला. पुण्यातील केसरी आणि मराठा ही वृत्तपत्रे सुरूवातीच्या कालखंडात आर्यभूषण या प्रेसवर छापण्यात येत होती.

पंडिता रमाबाई यांनी बायबलचे मराठी भाषांतर केले व ते छापण्यासाठी पुण्याजवळील केडगावी छापखाना काढला. मुंबई-पुण्यानंतर मात्र महाराष्ट्रात अनेक ठिकाणी छापखाने काढण्यात आलेत यात अहमदनगर, अकोला, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर या शहरांची नावे घेता येतील. मिशनऱ्यांनी मुंबई व अहमदनगर येथे छापखाने काढलेत. अहमदनगर येथे ज्ञानोदय या नावाने छापखाना सुरू झाला. या छापखान्यामुळे महाराष्ट्रभर वृत्तपत्रे, नियतकालिके आणि ग्रंथ निर्मिती करणे सोपे झाले. आज महाराष्ट्रात मुंबई-पुणे, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणी शासकीय व खाजगी मुद्रणालये आहेत. खाजगी छापखान्यामुळे ग्रंथ निर्मिती बरोबर वृत्तपत्रे, नियत कालिके, पोस्टर्स, बॅनर्स, नकाशे व समाजोपयोगी सर्व प्रकारचे साहित्य छापणे सोपे झाले आहे. मुद्रणालयाचे उपयोग :

**मुद्रणालयाचे खालीलप्रमाणे उपयोग आहेत.**

१) ज्ञानाचे व शिक्षणाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहेत. २) विविध विषय व त्यांचे उपविषय व विविध ज्ञान शाखांचा विस्तार व प्रसार मुद्रणाच्या कलेने वेगाने झाला.

३) ज्ञान व विज्ञानाच्या प्रसाराला मुद्रणालये कारणीभूत ठरली. ४) सामाजिक, राजकीय, आर्थिक व सिद्धांतीक विचार व त्यांचा प्रसार मुद्रणालयाच्या साहाय्याने सर्वसामान्यांपर्यंत पोहचण्यासाठी मुद्रणालयाचा फार मोठा उपयोग झाला.

मुद्रणालयाचे महत्त्व व उपयोग :

भारतात मुद्रणालयाची सुरूवात झाल्यामुळे ज्ञान-विज्ञानाचे क्षेत्र विकसित झाले त्यामुळे विविध विषय व त्यांच्या ज्ञानशाखांचा प्रसार वेगाने व्हायला सुरूवात झाली. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक, राजकीय व सैद्धांतिक विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचले. वृत्तपत्रे, नियतकालिके, प्रसिद्धीपत्रके व मातृभाषेत ग्रंथनिर्मिती होऊ लागल्याने जनजागृती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. त्याचबरोबर समाजातील जनसामान्यात चर्चा वादविवाद व संवाद घडवून आणण्यासाठी मुद्रण साहित्याची मदत झाली. वाचकासाठी मनोरंजनात्मक साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात विकसित झाली. मुद्रणालयाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक विकासासाठी पोषक वातावरण तयार झाले.

मुद्रणालयाच्या शोधामुळे मानवी मनातील भाव-भावना विचार, साहित्य कलाकृती व कल्पना अक्षरांच्या सहाय्याने शाईचा उपयोग करून कागदावर मुद्रीत होतात व एकाचवेळी त्यांच्या मोठ्या प्रमाणात आवृत्त्या निघायला

मदत होते. वृत्तपत्रे, मासिके, विविध विषयावरील ग्रंथ, पोस्टर्स इ. साहित्याची छपाई मुद्रणालयात केली जाते. २१ व्या शतकात संगणक आणि अत्याधुनिक ऑफसेट सारख्या यंत्र सामुग्रीचा वापर छपाईच्या कामी होत आहे. त्यामुळे त्यात आकर्षता वाढली व छपाईचा वेग वाढल्यामुळे कमी वेळात अधिक प्रति छापणे शक्य झाले. मुद्रणालयामुळे माहितीचा वेगाने प्रसार होऊ लागला. छापील साहित्य सहज उपलब्ध झाल्यामुळे विचारांचा प्रसार वेगाने व्हायला सुरूवात झाली. त्यामुळे लोकजागृती झाली नवी विचारसरणी उदयाला आली, त्यातून नवसमाज निर्मिती विकसित झाली. ग्रंथ छपाई झाल्यामुळे ज्ञानाची गंगा घरा घरापर्यंत पसरली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वृत्तपत्रांनी लोकजागृती करण्याचे काम वृत्तपत्रांनी केल्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वृत्तपत्राचे स्थान महत्त्वपूर्ण ठरले.

**मुद्रणालय स्वयंरोजगर व सेवासंधी :**

मद्रणालयचा शोध हा मुद्रण व्यवसायातील क्रांती आहे. या व्यवसायात स्वतःचा छापखाना सुरू करण्याची संधी प्राप्त होते व इतर कुशल-अकुशल कामगारांना रोजगाराची संधी मिळते. त्याचबरोबर हे तंत्रज्ञान आत्मसात केलेल्यांना पोस्टर्स, बॅनर व होर्डींग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर व्यवसायाची संधी मिळते. त्याचप्रमाणे एखाद्या ग्रंथाची अथवा बॅनरची मांडणी सजावट (लेआऊट ग्राफिक डिझाईन) येणाऱ्यांना आपोआप सेवेची संधी प्राप्त होते. मुद्रण व्यवसाय करणाऱ्यांना पूरक उद्योगही सुरू करता येतात उदा. मुद्रणासाठी लागणारा कागद व विविध प्रकारचे साहित्य विक्री करता येते. त्याचबरोबर वितरक व मुद्रक होण्याची संधी प्राप्त होते. त्याप्रमाणे अनेकांना जाहिरात, प्रसिद्धी आणि मुद्रक म्हणून शासकीय अशासकीय व खाजगी क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होतात. मुद्रणालयात जे साहित्य मुद्रीत होते त्यात वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथ, पोस्टर्स प्रकाशक, कॅटलॉग्ज, लेबल, पॅकींग, ट्रव्हलीग या क्षेत्रात सेवा व व्यवसायाची संधी प्राप्त होते. मुद्रण कला एकतंत्र व शास्त्र आहे. या मुद्रणतंत्रात संगणकावर टायपिंग, पेस्टिंग, कलरिंग सेटींग व बाईडिंगचे ज्ञान असणाऱ्यांना असंख्य सेवेच्या संधी आहेत. त्यामुळे छापखाने ही आज काळाची गरज होऊन बसली आहेत.

**वृत्तपत्रे :**

**वृत्तपत्र व त्याची व्याख्या :**

वृत्तपत्रांच मानवी जीवनातील स्थान अबाधीत व महत्त्वपूर्ण आहे. वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. वृत्तपत्रातून ज्ञानाचा प्रसार होऊन, स्वातंत्र्य व नितीमुल्ये यांची जपणूक होत असते. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, विविध प्रकारची माहिती, मतप्रदर्शन, मनोरंजनात्मक लिखाण, संपादकीय अग्रलेख इतर विचारवंताचे लेख इ. माहिती सर्वापर्यंत एकाच वेळी पोहचते. त्याचप्रमाणे शिक्षण व साक्षरता प्रसारासाठी वृत्तपत्र उपयुक्त ठरते. इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. वृत्तपत्रीय लेखन संपूर्णतः सत्य घटना दर्शविणारे असते. म्हणून वृत्तपत्रांना समाज जीवनाचा आरसा असे संबोधतात. या सर्वांचा परिपाक म्हणून की काय, वृत्तपत्र वाचल्याशिवाय माणसांच्या दिवसाची सुरूवात होत नाही, इतक महत्त्व मानवी जीवनात वृत्तपत्रांना आहे.

**वृत्तपत्राची व्याख्या :**

१) दररोजच्या घडामोडीची नोंद प्रसिद्ध करणारे ते वृत्तपत्र.

२) चालत्या काळाचे वर्तमान सांगणारे ते वृत्तपत्र.

३) वृत्त देणारे ते वृत्तपत्र. अथवा जगाचा एक दिवसाचा इतिहास म्हणजे वृत्तपत्र.

४ ) जनतेच्या जीवनाशी संबंधित घटनांवर भाष्य करणारे वार्तापत्र म्हणजे वृत्तपत्र.

वृत्तपत्रातून बातमी प्रसिद्ध करण्यावर भर दिलेला असतो. बातमीचा प्रसार करणारे एक प्रभावी आणि मानवी जीवनात लोकप्रीयतेचे माध्यम असणारे वृत्तपत्राचे स्थान आहे. बातमीला NEWS हा शब्द आहे. या शब्दातून North उत्तर East-

पूर्व West- पश्चिम व South- दक्षिण या दिशा नमूद होतात. याचाच अर्थ असा की, चारही दिशातून येणाऱ्या घटनांचे वृत्त म्हणजे बातमी NEWS होय.

**वृत्तपत्राचे उद्देश :**

वृत्तपत्रांचे मुख्य उद्देश आहेत ते खालीलप्रमाणे

१) लोक शिक्षण व लोक जागृती घडविणे.

) दैनंदिन घडामोडी नोंदविणे.

३) ४ दुर्बल घटकांना शक्तिशाली बनविणे.

६८ । उपयोजित इतिहास

२) अयोग्य घटनांचा निषेध करणे व अन्यायाला वाचा फोडणे.

५) माहिती देणे, विश्लेषण व विवेचन करणे, मनोरंजन करणे व जाहिरातीद्वारे ग्राहक व उत्पादक आणि वाचक यांची सेवा करणे ही वृत्तपत्रांची उद्दिष्ट्ये आहेत.

**वृत्तपत्राचा उदय :**

वृत्तपत्रांचा उदय माणसाच्या निरीक्षण व चौकस बुद्धिमतेतून व कुतुहुला पोटी झाला आहे. आपल्या सभोवताली काय घडत आहे हे जाणून घेण्याची उत्सूकता सर्वांनाच असते. माहिती जाणून घेण्याच्या प्रवृत्तीतून माहिती देण्याची पद्धत सुरू झाली. पूर्वी गावा-गावात दवंडी देणे, घंटा वाजवणे, भोंगा वाजवणे हे एक प्रकारे बातमी देण्याचेच प्राचीन प्रकार होते.

नवीन अघटित, ज्या घटनेविषयी सर्वांनाच उस्तूकता वाटेल अशा एखाद्या घटनेची माहिती सर्व प्रथम जाहीर करणे यास बातमी असे म्हणतात. आणि अशा बातम्यांचा प्रसार करण्याचे एक प्रभावी आणि लोकप्रिय माध्यम म्हणजे वृत्तपत्र आहे. युरोप देशात माहिती प्रसारित करण्यासाठी हस्तलिखीते, पत्रके, सार्वजनिक ठिकाणी लावण्याची पद्धत होती. इ.स. १६६६ मध्ये इंग्लंडमध्ये लंडन गॅझिट हे पहिले वृत्तपत्र निघाले. जगातील सर्व देशातील पाच अब्जाहून अधिक लोक हजारो भाषेतून निघणाऱ्या वृत्तपत्रांचे वाचक आहेत. जपानी, इंग्रजी व चिनी भाषेतील वृत्तपत्रांचा उल्लेख आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या दैनिकांत होतो. वृत्तपत्रांचा इतिहास सुमारे दोनअडीचशे वर्षाचा आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र म्हणजे दर्पण होय. हे वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकरांनी इ.स. १८३२ मध्ये काढले. त्यापूर्वीच्या कालखंडात ऐतिहासिक पत्रांनी वृत्तपत्राचे महत्त्वाचे कार्य केल्याचे आढळून येते. शिवकालीन व पेशवेकालीन पत्रे, मोगल काळातील अखबार किंवा खबरपत्रे त्या दृष्टीने वाचण्यासारखी आहेत. युरोपात पंधराव्या व सोळाव्या शतकात कोरंट किंवा गॅझेट निघत असत.

भारत देशात इंग्रजांच्या आगमना बरोबरच प्रबोधनाचे युग सुरू झाले. इंग्रजी भाषा व शिक्षणाचा प्रारंभ व प्रसार, त्यात नवनवीन शोधांचा लोकांना झालेला परिचय यामुळे सामाजिक जाणिवांचा जागर होऊन समाजपरिवर्तनाचे कार्य सुरू झाले. वृत्तपत्रे हे या बदलाचे फलीत आहे.

लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि मानवता, हक्का संदर्भात नव्या सामाजिक जाणिवा पारंपारिक भारतीय समाज मनावर रूजू लागल्या आणि त्यातूनच इंग्रजी गद्याचा मराठी अवतार निर्माण झाला. यातूनच प्रबोधनाची चळवळ उभी राहिली. सर्वप्रथम वृत्तपत्रांनीच ही जाणीव समाजमनात निर्माण केली. बंगालमध्ये वृत्तपत्रांनी सुरू केलेले प्रबोधनाचे कार्य मराठी वृत्तपत्रांनी महाराष्ट्रात आरंभिले. बंगालच्या प्रबोधन चळवळीचे सूत्रधार राजाराममोहन रॉय यांनी संवाद कौमुदी व मिसत् उल अखबार ही दोन वर्तमानपत्रे चालविली. देशातील लोकस्थितीची नेमकी काय अवस्था आहे याची

राज्यकर्त्यांना जाणीव करून द्यावी आणि लोकजीवनात सामाजिक सुधारणा करून परिवर्तन घडवून आणावे यासाठी वृत्तपत्रांनी कार्य करावे अशी राजाराममोहन रॉय यांची भूमिका होती.

**वृत्तपत्रांचा इतिहास :**

समाज मनाला प्रभावी आकार देण्यासाठी महत्त्वाची वैचारिक व इतर माहिती देण्याचे काम वृत्तपत्र करीत असतात. पोर्तुगीज लोकांनी इ.स. १५५० मध्ये भारतात मुद्रणकला अस्तित्वात आणली. खर म्हणजे ख्रिस्ती धर्मग्रंथ छापण्यासाठी मुद्रण यंत्रे भारतात आणली व ती विकसीत केलीत. कालांतराने भारतात ब्रिटीशांनी वर्चस्व निर्माण केले व आधुनिक स्वरूपाची मुद्रण यंत्रणा उभारली. त्यामुळेच भारतात ग्रंथ छपाईला व वृत्तपत्र या व्यवसायाला गती मिळाली. इ.स. १७८० मध्ये कलकत्याला जेम्स ऑगस्टस हिली याने सुरू केलेले बेंगॉल गॅझेट हे इंग्रजीह साप्ताहिक भारतातील १ ले वृत्तपत्र म्हणून उदयाला आले. जेम्स ऑगस्टस हिली याने आपल्या वृत्तपत्रातून वॉरण हेस्टीग्ज व एलिजा इम्पे या इंग्रज अधिकाऱ्यांवर टिका केल्यामुळे ब्रिटीश सरकारने त्याचा छापखाना जप्त केला होता. याच सुमारास द कलकत्ता गॅझेट, द इंडियन वर्ल्ड ही वृत्तपत्रदेखील उदयाला आलीत. या वर्तमानपत्रांचे वैशिष्ट्य म्हणजे ही वृत्तपत्रे इंग्रजी भाषेतून निघत, इंग्रज व्यक्तीच त्याचा संपादक असे व इंग्रज लोकच त्याचा वाचक वर्ग होता. समाचार दर्पण हे बंगाली साप्ताहिक म्हणजे देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र होय. यानंतरच्या काळात संपूर्ण भारतात वृत्तपत्रे निघालित आणि त्यांनी मौलिक कामगिरी केली. राजाराममोहन रॉय यांचे बंगाली संवाद कौमुदी व दादाभाई नौरोजी यांचे गुजराथी रास्त गोफ्तार ही वृत्तपत्रे त्यांनी अंगिकारलेल्या कार्यामुळे प्रसिद्धीस पावली. संवाद कौमुदी हे पुरोगामी विचारसरणी जोपासणारे वृत्तपत्र होते. हे वृत्तपत्र बंद झाल्यावर राजाराममोहन रॉय यांनी मिरात-उल-अखबार हे फारसी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले. त्याचप्रमणे बंगाल प्रांतात हिंदू पॅट्रीअट, अमृत बझार, पत्रिका, इंडियन मिटर, द बेंगाली, सोमप्रकाश, संजीवनी ही वृत्तपत्रे सुरू झालीत तर मुंबई प्रांतात दर्पण, प्रभाकर, रास्त गोफ्तर, नेटिव्ह ओपिनियन, इंदूप्रकाश, केसरी, मराठा इ. वृत्तपत्रे सुरू झालीत तर मद्रास प्रांतात हिंदू स्वदेशमित्र, आंध्र प्रकाशिका, केरळ पत्रिका ही वृत्तपत्रे कार्यरत होती तर संयुक्त प्रांतात ॲडव्होकेट, हिंदुस्थानी आझाद ही वृत्तपत्रे सुरू होती तर पंजाबमध्ये द ट्रिब्यून, अखबार-इ-आम, कोहिनूर या सर्व वृत्तपत्रांनी ब्रिटीशांच्या विरुद्ध जनमत जागृत केले. भारतातील देशी वृत्तपत्राच्या खपाचा आकडा इ.स. १८८५ ते इ.स. १९०५ या कालखंडात सुमारे २,९९,००० वरून ८,१७,००० पर्यंत वाढला. हा वतृत्तपत्रांचा विक्रमी खपाचा आकडा होता. इ.स. १७८९ मध्ये मुंबईत बॉम्बे हेरॉल्ड तर इ.स. १८२२ मध्ये सुरू झालेले मुंबईना समाचार हे गुजराथी भाषेतील वृत्तपत्र भारतीय मालकीचे १ ले वृत्तपत्र होते. बाळशास्त्री जाभेकरांनी इ.स. १८३२ मध्ये मराठी भाषेतून दर्पण हे पहिले साप्ताहिक १८४० मध्ये बंद केले. त्यानंतर इ.स. १८४० मध्ये दिग्दर्शक हे १ ले मराठी मासिक त्यांनी सुरू केले. १९ व्या शतकात आरंभी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण करण्याचे काम प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदूप्रकाश, दीनबंधू, निबंधमाला, केसरी, मराठा, सुधाकर, काळ, या वृत्तपत्रांनी केले. मुंबईतील काही वृत्तपत्रांनी ब्रिटिशांवर टिका केल्यामुळे वृत्तपत्रावर निर्बंध लादण्यात आले. इ.स. १८२५ मध्ये वृत्तपत्रांच्या मालकांनी, संपादकांनी व मुद्रकांनी आपली नावे व इतर माहिती नोंदविणे सक्तीचे व बंधनकारक केले. परंतू याचा वृत्तपत्रांवर फारसा परिणाम झाला नाही. दिवसेंदिवस वृत्तपत्रांची संख्या वाढतच होती. इ.स. १८८०- ८१ ही संख्या ८१ पर्यंत पोहोचली. बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे वृत्तपत्र इंग्रजी व मराठी या दोन भाषेत निघत होते. इ.स. १८४१ मध्ये भाऊ महाजन यांनी प्रभाकर हे वृत्तपत्र सुरू केले. जे २१ वर्षापर्यंत चालू होते. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांची शतपत्रे इ.स. १८४८ ते इ.स. १८५० या काळात प्रभाकर मधून प्रसिद्ध झालीत. इ.स. १८४२ मध्ये अहमदनगर येथील मिशनऱ्यांनी ज्ञानोदय सुरू केले. तात्या छत्रे यांनी इ.स. १८४२ मध्ये ज्ञानसिंधू नावाचे साप्ताहिक सुरू केले. कृष्णाजी भिंबक रानडे यांनी इ.स. १८४९ मध्ये ज्ञानप्रकाश साप्ताहिक सुरू केले.

इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतून इंदुप्रकाश नावाचे वृत्तपत्र प्रकाशित होत होते यातून त्यांनी समाजातील अनिष्ठ रूढीवर प्रहार केले. त्याचप्रमाणे इ.स. १८७७ मध्ये दीन बंधू हे वृत्तपत्र सुरू झाले. शोषित वर्गाच्या हक्कावर त्यांचा विशेष भर होता. इ.स. १८८७ मध्ये केसरी हे मराठी तर मराठा हे इंग्रजी वृत्तपत्र लोकमान्य टिळक, गो.ग. आगरकर व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी सुरू केले. केसरी या वृत्तपत्राचे आगरकर हे पहिले संपादक होते. पुढे त्यांचे

टिळकांशी मतभेद झाले व त्यांनी संपादक पदाचा त्याग करून इ.स. १८८८ मध्ये सुधारक हे वृत्तपत्र सुरू केले. या सर्वच वृत्तपत्रांनी ब्रिटीश घोरणाविरुद्ध आपली लेखणी चालविली त्यामुळे ब्रिटीशांनी आपली सत्ता जाऊ नये म्हणून वृत्तपत्रांवर निर्बंध घातले. यात लॉर्ड वेलस्लीने वृत्तपत्रांवर चांगलीच कडक नियंत्रणे लादली. पुढे लॉर्ड हेस्टिंग्जने ति काढून टाकली. पुढे अॅडमनने वृत्तपत्र सुरू करण्यासाठी सरकारची परवानगी घेणे व ब्रिटीश सरकारविरुद्ध लिहणार नाही अशी हमी घेऊनच परवानगी देण्याचे धोरण स्विकारले. राजाराममोहन रॉय यांनी वृत्तपत्रांच्या या कायद्यांच्या विरोधात जनजागृतीचे धोरण स्विकारले. इ.स. १८५७ मध्ये भारतात ब्रिटीश सत्तेविरुद्ध चांगलाच उठाव झाला. त्यामुळे १८५७ मध्ये ब्रिटीशांनी लायसनिंग अॅक्ट काढला. या कायद्याने सर्व वृत्तपत्रांना सरकारी अनुज्ञापत्र काढण्याच्या जाचक अटीतून जावे लागले. तरीही ब्रिटीश सरकारवर वृत्तपत्रांनी टिका करणे सोडल नाही त्यामुळे इ.स. १८६७ मध्ये द प्रेस अॅन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक अॅक्ट पास केला या कायद्यान्वये वृत्तपत्रांच्या मालकांना, व प्रकाशकांना आपली नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करावित व ती तपासणीसाठी शासनाकडे पाठवावीत व ब्रिटीश शासनाविरुद्ध लिहणार नाही अशी लेखी हमी द्यावी असे ठरविले. याचवेळी अफगाण युद्ध उद्‌भवले. भारतीय अर्थव्यवस्थेवर या युद्धाचा परिणाम झाला. वृत्तपत्रांनी यावर टिका सुरूच ठेवली त्यामुळे ब्रिटीशांनी व्हरनॅक्युलर प्रेस अॅक्ट पास केला. या कायद्यान्वये वृत्तपत्रांना सरकारी धोरणावर टिका टिपणी करता येत नव्हती. केल्यास मुद्रणालये जप्त करण्याचा सरकारला अधिकार होता. व या निर्णयाविरोधात वृत्तपत्रांना न्यायालयातही जाता येणार नव्हते अशाप्रकारे ब्रिटीशांनी वृत्तपत्रांची गळचेपी सुरू ठेवली. लॉर्ड रिपनने इ.स. १८८२ मध्ये व्हर्नाक्युलर प्रेस अॅक्ट रद्द केला. इ.स. १९०५ च्या बंगालच्या फाळणीमुळे ब्रिटीशांविरुद्ध भारतीय वृत्तपत्रांनी टिकेची झाडे उठवीली त्यामुळे पुन्हा इ.स. १९०८ मध्ये न्यूज पेपर्स अॅक्ट ब्रिटीशांनी पास केला. या कायद्याने वृत्तपत्रावर बरीच बंधने आलीत. इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर वृत्तपत्रांनी काँग्रेसच्या ध्येय धोरणांची, माहिती आपल्या वृत्तपत्रांतून द्यायला सुरूवात केली. वृत्तपत्रातून प्रखर राष्ट्रवाद व ब्रिटीश सत्तेविरुद्ध निर्भिड लेखन झाल्यामुळे वृत्तपत्रांनी ब्रिटीशांच्या अन्यायी धोरणाविरुद्ध जनमन जागृत करून राष्ट्रवादाची भावना वाढीस लावली. त्यामुळे सर्वसामान्य लोकही स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जनसामान्यात आवश्यक असलेला त्याग देशभक्ती, ध्येयनिष्ठा व धैर्य वृत्तपत्रांनी निर्माण केले. एकूणच देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात वृत्तपत्रांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावून आपले योगदान दिले. वृत्तपत्र क्षेत्रातील संधी :

१ ) वार्ताहार, वृत्तसंपादक, प्रादेशिक विभाग, उपसंपादक, वृत्तलेख संपादक,. स्तंभलेखक छायाचित्र संपादक, संपादक उपसंपादक म्हणून वृत्तपत्रात सेवेची संधी मिळते.

२) वृत्तपत्र कार्यालयातील सेवा, वृत्तनिवेदक, विशेष वृत्तपत्र प्रतिनिधी,

स्तंभलेखक, वृत्तपत्र विक्रेता, व वितरक जाहिरात प्रतिनिधी म्हणून वृत्तपत्रक्षेत्रात सेवेची संधी प्राप्त होते.

३) संगणक विभागात टायपिस्ट, आकृती, फोटोशॉप नकाशे सांख्यिकी विभाग सहाय्यक म्हणून काम करता येते.

४) वृत्तपत्र कार्यालयात स्टोअर किपर, ग्रंथापाल, विविध प्रकारची पत्रकारिता राजकीय, आर्थिक, ग्रामिण, फिल्म, क्रिडा, रेडिओ या विभागात पत्रकार होता येते.

**ऑनलाईन वृत्तपत्रे :**

दैनिके इंटरनेटवर उपलब्ध झाली याचा अर्थ असा की, या दैनिकांची ऑनलाईन आवृत्ती सुरू झाली. दैनिकाच्या इंटरनेट अविष्काराला ऑनलाईन दैनिक असे म्हणतात. याचा अर्थ असा की, सदैव उपलब्ध मुद्रीत वृत्तपत्र सायंकाळ पर्यंत शिळे होते परंतू ऑनलाईन दैनिकाचे तसे नाही दर तासाला सततची माहिती त्यात अद्ययावत म्हणजे अपडेट केली जाते. म्हणजे वाचकाला अपडेट बातमी वाचायाला मिळते. आज ऑनलाईन उपलब्ध असणारी भारतीय दैनिके म्हणजे टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन ओक्सप्रेस, हिन्दुस्थान टाईम्स, दैनिक भास्कर, लोकमत, बिझनेसवर्ल्ड, दैनिक जागरण, डेक्कन हेरॉल्ड, गुजरात समाचार इ. नियत कालिके :

नियतकालिके विशिष्ठ ठरविलेल्या काळात मुद्रीत केलेल्या लिखाणास प्रसिद्धी देतात. ठराविक काळ म्हणजे, सात दिवसानंतर, पंधरा दिवसानंतर, एक महिन्यानंतर, तीन महिन्यानंतर, सहा महिन्यानंतर किंवा एका वर्षानंतर प्रकाशित होणाऱ्या मुद्रीत लिखाणास नियत कालिक असे संबोधतात.

अनेक लेखकांचे विविध विषयावरील लिखाण संपादक संकलित करतो. हे लिखाण सर्व साहित्य प्रकारातील असते. व नियतकालिकांचा जो ठरलेला कालावधी असेल त्यावेळी प्रसिद्ध करतात. यालाच नियतकालिक असे म्हणतात. नियतकालिकाची व्याख्या :

१) 'नियतकालिक' या शब्दाचा अर्थ ठराविक कालावधीत प्रकाशित होणारे पत्र असा आहे.

२) मनोरंजक आणि ज्ञानवर्धक मजकूर नियमित कालावधीत पुरवणारे पत्र म्हणजे नियतकालिक होय.

३) नियमितपणे प्रसिद्ध होणारे आणि ज्यात अनेक लेखकांचे विविध विषयांवरचे किंवा विशिष्ट विषयासंबंधीचे लिखाण संकलीत केलेले असते त्यास नियतकालिक असे म्हणतात.

**नियतकालिकाचे प्रकार व स्वरूप :**

कालावधी वरून त्या नियतकालीक संबंधीत नावाने ओळखले जाते. उदा. सात दिवसानंतर प्रकाशित होणारे साप्ताहिक, तसेच पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, समासिक-अर्धवार्षिक, आणि वार्षिक असे नियतकालिकांचे प्रकार असतात.

अर्थकारण, समाजकारण, निसर्ग, शिक्षण, संशोधन, शासकीय माहिती पुरविणारे, खाजगी कंपन्याची माहिती पुरविणारे, अशा विविध विषयांना वाहिलेली नियतकालिके असतात. रंजनात्मक, मनोरंजनात्मक, नियतकालिकांना इंग्रजीत मॅगझीन् magazine तर वैचारिक, संशोधनात्मक नियतकालिकांना जर्नल किंवा रिव्हयू Jouranal असे म्हणतात.

वाचकांची आवड लक्षात ठेवून नियतकालिके मजकूर प्रसिद्ध करतात. साप्ताहिकातून मुख्यतः कथा, कविता, प्रवासवर्णन, भटकंती, क्रिडावृत्त यावर लेखन असते. तर मासिकातून वैचारिक लेख प्रकाशित करतात. अलिकडे संशोधनात्मक लेख प्रसिद्ध करण्यासाठी अनेक रिसर्च जर्नल्स निघालेले आहेत. त्यातून विविध विषयावरील शोधनिबंध प्रसिद्ध केले जातात. नियतकालिकात सारसंग्रह, (डायजेस्ट) कालिक (जर्नल) सांवत्सारिक (वार्षिकी) यांचा समावेश होतो.

द्वैमासिके, त्रैमासिके हे विचारप्रणालीशी निगडीत असतात. साप्ताहिकांचा विशिष्ट वाचक वर्ग आहे त्यांच्यासाठी काव्य, क्रिडा, सामाजिक घटनाक्रम, कथा, प्रवासवर्णने, एखाद्या स्थळाचे वर्णन व माहिती त्याचप्रमाणे विशिष्ट उत्सव व त्यांची माहिती साप्ताहिकातून दिली जाते. साप्ताहिकापेक्षा मासिके ललित आणि वैचारिक लिखाणाच्या प्रसिद्धीला महत्त्व देतात. परंतू आज मनोरंजनात्मक लिखाण प्रसिद्ध करणाऱ्या नियतकालिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. नियतकालिके ही वाचकाला उद्योग, व्यापार या क्षेत्रांशी चिकित्सक व माहितीपूर्ण ज्ञान देण्याचे कार्य करतात.

**भारतातील नियतकालिके :**

भारतात ब्रिटीश कालखंडात वर्तमानपत्रे सुरू झालीत. सुरूवातीला ती साप्ताहिक स्वरूपातच होती. त्यातील बहुतेक इंग्रजी भाषेतच होती. भारतीय भाषेतील पहिले नियतकालिक सुरू झाले ते बंगाली भाषेतून.

भारताचा इतिहास, संस्कृति आणि समाज यांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करणे हा रॉयल एशियाटिक सोसायटीचा उद्देश होता. सोसायटीचे संशोधनात्मक कार्य किंवा संशोधनात्मक लेख-निबंध प्रकाशित करण्यासाठी 'एशिवसाटिक

रिसर्चेस' या नियतकालिकाची सुरूवात करण्यात आली. भारतातील इतिहास संशोधनाचे प्रकाशित करण्यासाठी इंडियन अँटिक्वेटीची सुरूवात करण्यात आली. इ.स. १८९२ मध्ये शिलालेखांना प्रसिद्ध करण्यासाठी 'एपिग्राफिक इंडिया' हे नियतकालिक सुरू झाले. भारतीय इतिहास आणि संस्कृतिसंबंधी लेखन या नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्यात आले.

**भारतातील प्रसिद्ध नियतकालिके :**

भारतातील प्रसिद्ध आणि लोकप्रिय दैनिकांत करंट, इंडियाटुडे, फोरम, फ्रंटलाईन, आऊटलुक, वोक इ. नियतकालिकांची गणणा होते. इंडिया टुडे मधील छायाचित्रे व माहिती उच्च दर्जाची असते तर आर्थिक विषयातील माहिती व घडामोडीसाठी कॅपिटल, कॉमर्स, इकानॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली हे नियतकालिक प्रसिद्ध आहे. शेती व शेती व्यवसायाशी पूरक व्यवसायासंबंधी माहिती व लेख ॲग्रीकल्चर एज्युकेशन इन इंडिया, अँग्रोवन व कृषीदर्शन या नियतकालिकातून प्रसिद्ध केली जाते. महिला जगतात इ.स. १९५९ मध्ये स्थापन झालेले फेमिना हे मासिक प्रसिद्ध आहे. क्रिडासंबंधी वार्ता व माहितीसाठी स्पोर्टसविक, स्पोर्टस डायजेस्ट हे मासिक प्रसिद्ध आहे. विशिष्ट विषयासंबंधी लिखाण प्रसिद्ध करणारे 'सेमिनार' हे नियतकालिक १९७१ पासून सुरू झाले असून ते अत्यंत लोकप्रिय आहे.

**मराठी भाषेतील नियतकालिके :**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दिग्दर्शन' हे मराठी भाषेतील पहिले मासिक म्हणजे नियतकालिक प्रसिद्ध केले. या मासिकानंतर मराठी भाषेत अनेक नियतकालिकांना सुरूवात झाली. लोकजागृती घडविण्यात आणि ज्ञानाचा प्रसार करण्याच्या कार्यात नियतकालिकांचे कार्य अत्यंत उपयुक्त ठरले. विशेषतः या नियतकालिकांची नावे 'ज्ञान' दर्शक होती. इ.स. १८५० च्या नंतर ज्ञान- विज्ञानाबरोबर मनोरंजन, विविध विषय व प्रकार आणि विचारधारांचा प्रसार व प्रचार नियतकालिकांनी केला.

विदर्भ साहित्य संघाचे युगदाणी हे मासिक प्रसिद्ध आहे. तर जळगावहून निघणारे फक्त कविता या काव्यप्रकाराला वाहिलेले काव्यरत्नावली नामक नियतकालिक प्रसिद्ध होते. समाज जीवनाचे चित्र नियतकालिकांनी प्रसिद्ध केले. नियतकालिकांचे काही अंक एखाद्या व्यक्तिची संपूर्ण माहिती देणारे असायचे हे वैशिष्ट्यही नियतकालिकांनी जोपासले. आजच्या घडीला मराठी नियतकालिकांत गृहिणी, प्रपंच, मानिनी, संजीवनी यांचा वाचक वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. स्त्री हे मासिक स्त्री जगतात अत्यंत वाचनीय व लोकप्रिय असल्याने त्याचा मोठा वाचक वर्ग आहे. आनंद, खेळगडी, कुमार, किशोर, चांदोबा हे बालमनावर उत्तम संस्कार घडविणारे नियतकालिके लहान मुलांसाठी होती. प्रतिष्ठान, जीवन शिक्षण, शिक्षण संक्रमण व महाराष्ट्र शासनाचे लोकराज्य आजही सर्व सामान्यात व ग्रामिण भागातही लोकप्रिय आहे. लोकराज्य या मासिकाचा वाचकवर्ग फार मोठा असून त्याच्या पाच लाखाच्या वर प्रति मुद्रीत होतात. लोकराज्य ह्या मासिकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे विविध विषयावरील विशेषांक अत्यंत लोकप्रिय होते. आजही ते लोकांच्या संग्रही सापडतात. योजना व कुरूक्षेत्र या नियतकालिकांतून महाराष्ट्र शासनाला ध्येय धोरणे व योजना प्रसिद्ध होतात.

इतिहास विषयाशी बरीच मासिके संलग्न आहेत. त्यात भारतीय इतिहास आणि संस्कृति हे त्रैमासिक इतिहास संशोधनमंडळ दादर येथून प्रसिद्ध होते. संशोधन हे त्रैमासिक इतिहासचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ धुळे येथून प्रसिद्ध होते. यांत संशोधनात्मक लिखाणाला प्रसिद्धी दिली जाते. इतिहास विषयाशी संबंधीत मोठा वाचकवर्ग या मासिकाला मिळाला आहे. त्याचप्रमाणे इतिहास शिक्षण मंडळाचे इतिहास शिक्षक हे नियतकालिक इतिहास विषयासंबंधी लिखाण प्रसिद्ध करते. हैद्राबाद येथून पंचधारा तर दिल्ली येथून मायमराठी या मालिकातून मोठ्या प्रमाणावर मराठीतून विविध विषयावरचे साहित्य प्रकाशीत केले जाते. त्याचप्रमाणे अस्मितादर्श, निकाय, अस्तित्व या मासिकातून उपेक्षित वर्गाच्या दु:खाला वेदनांना शब्दरूप देऊन प्रसिद्ध केले जाते. मराठी भाषेतील १ले मासिक मुंबईतून प्रसिद्ध झाले. त्याचबरोबर पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, नागपूर, जळगाव, औरंगाबाद इ.

शहरातूनही चांगली नियतकालिके प्रसिद्ध होत आहे. आजही खालील नियतकालिके मराठीतून निघत असून ते मनोरंजन, प्रबोधन, शिक्षण, कविता-कथा प्रसिद्ध करण्याचे कार्य करित आहेत. त्यांत मिळून साऱ्याजणी, चारचौघी, सत्याग्रही, लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ, अर्थ मंथन, विवेक, साधना, लोकराज्य ज्ञानोदय, संवादपत्रिका, बळीराजा, शेतकरी, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, समाज प्रबोधन पत्रिका, सत्याग्रही, आंदोलन शाश्वत विकासासाठी परिवर्तनाचा वाटसरू इ. उल्लेख करता येईल.

**भारतीय भाषेतील प्रसिद्ध नियतकालिके :**

१) संस्कृत :-

१) विद्यालय-लाहोर २) मंजूभाषिनी-कांचीपुरम ३) संस्कृत-चंद्रीका-महाराष्ट्र ४) सुप्रभात, अमरभारती-वाराणसी ५) संस्कृत रत्नाकर-जयपूर.

२) बंगाली :-

समाचार दर्पण, दिग्दर्शन, संवाद कौमुदी, संवाद प्रभाकर कलकत्ता.साधना, भारती, बालक-रविंद्रनाथ टागोर

३) हिंदी :-

हंस-प्रेमचंद  रूपम-सुमिमानंद पंत

चंदामामा-तामिळनाडू  राष्ट्रभारती-वर्धा  कुरूक्षेत्र व योजना-दिल्ली

४) गुजराथी :-

१) मुंबई समाचार-मुंबई २) विद्यासागर, बुद्धीवर्धक, बुद्धीप्रकाश, ज्ञानसुधा, सुदर्शन, कैसर-ए-हिंद, नवजीवन, हरिजन महात्मा गांधी

५) मराठी :-

१) दिग्दर्शन २) ज्ञानोदय ३) ज्ञानसेतू, ४) ज्ञानप्रकाश ५) ज्ञानसंग्रह ६) ज्ञानदर्पण,

७) निबंधमाला ८) केसरी ९) सुधारक १०) मूकनायक, ११) बहिष्कृत भारत,

१२) महाराष्ट्र साहित्य पत्रिका, १३) पंचधारा, संशोधक, भारतीय इतिहास व

संस्कृती १६) लोकराज्य १७) योजना-सर्व मराठीतून

६) मल्याळम :-

१) मनोरमा २) बलरामा ३) वनिता ४) गृहलक्ष्मी

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध नियतकालिके :**

१) डरबॅयूलिक मोनाट्स इ.स. १६६३ मध्ये जगातील पहिले नियतकालिक जर्मनीत सुरू झाले.

२) मर्क्युरी गॅलंट - ३० मे १६७२ मध्ये फ्रान्समध्ये सुरू झालेले पहिले नियतकालिक याचे प्रारंभीचे नाव गॅझेट-दा फॉन्स असे होते.

३) अॅथेनियन मक्युरी इ.स. १६९० मध्ये इंग्लंडमध्ये सुरू झाले. मनोरंजनाने

धर्मयुग-धर्मवीर भारती कर्मभूमी  वीणा मध्यभारत-हिंदी सर्वोदय जगत-बनारस सोमप्रकाश-पं. ईश्वरचंद्र विद्यासागर ३) बंगदर्शन-बंकिमचंद्र चट्टोपाध्याय

साहित्य

१) उदण्डमार्तण्ड-पं. युगल किशोर शुक्ल २) विश्वभारती-रविंद्रनाथ टागोर लिखाणासाठी प्रसिद्ध महिला वर्गात लोकप्रिय झालेले नियतकालिक.

४) लेडीज मक्युरी - २७ फेब्रु १६९३ मध्ये इंग्लंडमधील महिला वर्गात लोकप्रिय झालेले हे दुसरे नियतकालिक जॉन ड्युरॉन याने सुरू केले.

५) टाईम मॅगझीन - इ.स. १९२३ मध्ये अमेरिकेत सुरू झालेले जगातील सर्वात लोकप्रिय मॅगझीन.

६) एशियारिक रिसर्चेस इ.स. १७८८ मध्ये एशियारिक सोसायटीने संशोधनाचे कार्य प्रसिद्ध करण्यासाठी हे नियतकालिक (जर्नल) सुरू केले. एकूण २० खंड प्रसिद्ध केलेत.

७) दिग्दर्शन - इ.स. १८४० मध्ये मराठी भाषेतील पहिले नियतकालिक सुरू झाले.

८) एपियाग्राफिक इंडिया इ.स. १८९२ मध्ये शिलालेखांना प्रसिद्धी देण्यासाठी सुरू करण्यात आले.

९) रोडर्स डायजेस्ट - इ.स. १९२२ मध्ये विविध विषयावरील लेख एकत्र करून प्रकाशित करण्यात सुरूवात केली.

१०) लोकराज्य - इ.स. १९४८ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुरू केले. सुमारे पाच लाखाच्या वर वाचक असलेले मासिक.

नियतकालिकांचे कार्य :

१) ज्ञानविज्ञानाचा प्रसार, समाजजागृती व प्रबोधन करणे

२) विविध विषय, समकालीन घटना यावर लेखन करून सहभाग देण्याचे कार्य

नियतकालिके करतात.

३) संशोधन, विज्ञान, राजकीय हक्क विशिष्ट विषयासंबंधीचे लिखाण व या विषयांबरोबरच मनोरंजनाचे कार्यही नियतकालिकांमधून होते.

४) सामाजिक समस्यांचे निर्मुलन करणारी नियत कालिके आहेत. उदा. भ्रूणहत्या, बालविवाह, विधवा पुर्नविवाह, अंधश्रद्धा निर्मुलन, बळी प्रथा, मुलगी वाचवा

यावर लेखन करून समस्या सोडविण्याचे कार्य करतात. ) शोध व संशोधक विषयक लेखन प्रसिद्ध करण्याचे कार्यात साप्ताहिके, ५

मासिके, त्रैमासिके यांचे योगदान महत्त्वाचे आहे. लेखन-साहित्य-वाङ्मयाला चालना देऊन समाजात नवविचारांची पिढी घडविण्याचे कार्य नियतकालिके करतात. त्याचप्रमाणे मध्ययुगीन परंपरेतून बुद्धीवादाकडे भौतिकवादाकडे वाटचाल करण्याच्या कार्यात नियतकालिकांचे योगदान मोलाचे ठरले आहे.

**ड) विजाणू शास्त्रीय माध्यमे (इलेक्ट्रॉनिक मीडिया)**

१) आकाशवाणी : नमोवाणी (आकाशवाणी) दूरचित्रवाणी ही विजाणूशास्त्रीय म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमे असून संगणक व इंटरनेट द्वारे चालणाऱ्या माध्यम सेवेस नवमाध्यमे असे म्हणतात. यांना इंग्रजीत इलेक्ट्रॉनिक मिडिया असे संबोधतात. इतिहासाच्या दृष्टीकोनातून विजाणूशास्त्रीय माध्यमे अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. २० व्या शतकात ह्या

साधनांचा शोध लागल्यावर त्यांचा विकस जलद गतीने घडून आला. आजच्या माहिती तंत्र युगाचा आधारच ही माध्यमे आहेत.

२) नभोवाणी (रेडिओ) हवेत असणारे तरंग संदेश वहन करू शकतात. याचा शोध गुगलेल्मी मार्कोनी यांनी लावला. संदेश ध्वनीरूपात पोहचण्यात त्याला यश मिळाले. इ.स. १९२० साली अमेरिकेत रेडिओ केंद्राची सुरूवात झाली. इ.स. १९२२ मध्ये ब्रिटीश ब्रॉडकॉस्टिंग कॉर्पोरेशनची B.B.C ची सुरूवात झाली. भारतात नभोवाणी प्रसारणाला इ.स. १९२६ साली सुरूवात झाली. इंडियन ब्रॉडकॉस्टिंग कंपनी या खाजगी आस्थापनाने तेव्हाच्या ब्रिटीश राज्यकर्त्यांबरोबर करार करून २३ जुलै १९२७ रोजी मुंबई येथे नभोवाणी केंद्राची स्थापना केली. त्यानंतर २६ ऑगस्ट १९२७ मध्ये कलकत्ता येथे नभोवाणी केंद्र सुरू झाले. या दोन्ही नभोवाणी केंद्राची क्षमता फक्त ४८ किलोमीटर एवढी होती. त्या काळी देशभरात नभोवाणी संचाची संख्या फक्त हजारावर होती. लाहोर, अलाहाबाद, पेशावर, आणि डेहराडून ना गावामध्ये तेव्हा खाजगी हौशी रेडिओ क्लब होते. म्हैसूर संस्थानने इ.स. १९३५ मध्ये स्वतःचे नभोवाणी केंद्र सुरू केले. त्याला आकाशवाणी हे नाव देण्यात आले होते. हेच नाव १९३७ साली सरकारने नभोवाणी सेवेसाठी निश्चित केले. निजाम संस्थानानेही औरंगाबादला नभोवाणी केंद्राची स्थापना केली होती.

इ.स. १९३७ मध्ये व्हाईसराय लॉर्ड लिनलियगो यांनी आयबीसीचे नाव ऑल इंडिया रेडिओ (AIR) असे ठेवले. प्रारंभी AIR ला नभोवाणी हे नाव होते. रविंद्रनाथ टागोरांनी कलकत्ता रेडिओसाठी 'आकशवाणी' ही कविता लिहिली व इ.स. १९५७ मध्ये रेडिओला आकाशवाणी हे नाव देण्यात आले. स्वातंत्र्यानंतर मात्र आकाशवाणीचा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर झाला. सध्या भारतात आकाशवाणीची १९५ केंद्रे आहेत. आकाशवाणीचे एकूण ३०० प्रक्षेपण देशात कार्यरत आहेत. त्यांचे प्रसारण देशाच्या ९० टक्के भौगोलिक क्षेत्रात व ९७.३ टक्के लोकसंख्येपर्यंत पोहचते आहे. देशात स्थानिक आकाशवाणी केंद्राची संख्या ७४ आहे. स्थानिक स्वरूपाचे शेती, पाणी, शिक्षण, दळणवळण, आरोग्य इ. प्रश्न मांडले जावेत व स्थानिक कलावंताना विशेषतः लोक कलावंताना संधी मिळावी

या उद्देशाने स्थानिक आकाशवाणी केंद्रे उभारण्यात आली आहेत. देशातील सर्वच आकाशवाणी केंद्राचे टप्प्याटप्याने अत्याधुनिकरण करण्यात येत आहे. फोन आणि इंटरनेटद्वारे प्रक्षेपण करावयालाही प्रारंभ झाला आहे.

आकाशवाणीच्या वृत्त विभागातर्फे विविध भाषामध्ये मिळून ३०३ वार्तापत्रे प्रसारीत होता. वृत्तसंकलनासाठी वार्ताहारांचे विस्तृत जाळे देशभरात आहे. आकाशवाणीना स्वतंत्र विदेश प्रसारण सेवा आहे. दररोज २४ परदेशी भाषातून प्रसारण केले जाते. भारत देशात इ.स. १९६७ साली आकशवाणीची विविध भारती ही विज्ञापन सेवा सुरू झाली. सध्या विविध भारतीची ३० केंद्रे, सर्वसाधारण स्वरूपाची ५५ केंद्रे ७२ स्थानिक आकाशवाणी केंद्रे व ५ महानगर एफ-एम केंद्रे यावरून ही सेवा प्रसारीत होते. आकाशवाणी वरील जाहिराती या आकाशवाणीचा उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग आहे. याशिवाय आकाशवाणीवर नभोनाट्य, कुंटबकल्याण, शेतकऱ्यासाठी कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन, प्रौढशिक्षणासाठी कार्यक्रम, विज्ञान-तंत्रज्ञान, कामगार-महिला युवक, बालके व वृद्ध अशा विविध वयोगटातील श्रोतुगटासाठी कार्यक्रम आकाशवाणी सादर करते.

**एफ एम रेडिओ :**

भारतात रेडिओ हे मनोरंजनाचे सर्वात आवडते माध्यम आहे. सुरूवातीच्या काळात रेडिओसाठी परवाना घ्यावा लागत होता. आता मात्र ही अट रद्द झाली असून रेडिओ सहजगत्या उपलब्ध होतात. रेडिओमध्ये एफ.एम. रेडिओ सर्व वयोगटातील श्रोतुवर्गासाठी लोकप्रिय साधन आहे. रेडिओच्या प्रसारणसाठी विद्युत लहरी आवश्यक असतात. विद्युत लहरीचे कंपन मोजण्याचे एकक हर्टूज आहे. अत्यंत सुस्पष्ट आवाज हे एफ. एम रेडिओचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. इ.स. १९७७ साली भारतात सर्वप्रथम चैन्नई या शहरात एफ.एम.

रेडिओची सुरूवात झाली. इ.स. १९९० च्या सुमारास देशात अनेक शहरात खाजगी एफ.एम केंद्रे सुरू झाली आहेत व आजही त्यांची संख्या वाढतच आहे. एफ.एम. रेडिओ सोबत असला की, त्या व्यक्तीला घरबसल्या ठिकाणी,

प्रवास करतांना विनामुल्य संगीत, गाणी, घडामोडी, कार्यक्रम, व बातम्या ऐकता येतात. एफ.एम रेडिओद्वारा ज्वलंत व सामाजिक प्रश्नावर आधारीत चर्चा व कार्यक्रम सातत्याने प्रसारीत होत राहतात. एफ. एम चे वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक तंत्रामुळे श्रोत्यांचा सहभाग अगदी सहज होतो यामुळे ही सेवा सगळ्यात लोकप्रिय होण्यास हातभार लागत आहे. एफ. एम म्हणजे Frequency-modulation काळानुरूप रेडिओने नवे रूप धारण केले नव्या उपयुक्त सेवा सुरू केल्या त्यामुळे एफ.एम.

आज मनोरंजनाचे सर्वत्र लोकप्रिय माध्यम म्हणून प्रसिद्धीला पावत आहे. रेडिओचे आकार व वजन कमी केल्याने त्याची उपयुक्तता वाढली. एवढेच नव्हे तर भ्रमणध्वनी मध्ये एफ.एम. ऐकण्याची सुविधा असल्याने त्याची लोकप्रियता वाढली आहे. आज एफ.एम रेडिओ आकाशवाणी प्रसारभारतीच्या एफ.एम रेनबो २२ केंद्रावरून तर एफ. एम गोल्ड चार महानगरातून आपली सेवा प्रसारीत करीत आहे. रेडिओ मिर्ची ही खाजगी एफ.एम सेवा ३२ शहरात चालू आहे. बिग एफ.एम. ची ४५ प्रसारण केंद्रे असून आज भारतात एकूण ८ शहरातून २४५ खाजगी एफ.एम रेडिओ प्रसारण केंद्रे देशात कार्यरत आहेत. काही काळात ही संख्या ८३९ होणार असून २९४ शहरांना जोडली जाणार आहे. एफ.एम. रेडिओची लोकप्रियता वाढतच असल्याने भविष्यात संपूर्ण भारतभर ही केंद्रे उघडण्याची दाट शक्यता वाटते..

**दुरदर्शन :**

इ.स. १९३० च्या दशकात अमेरिका युरोपात दूरचित्रवाणीचा प्रसार झाला. इ.स. १९५९ मध्ये भारतात दूरचित्रवाणी म्हणजे दूरदर्शनची सुरूवात झाली. इ.स. १९७६ पर्यंत आकाशवाणी आणि दूरदर्शन ही दोन्ही माध्यमे एकत्रितच कार्यरत होती. देशात बातम्या प्रसारीत करणे, शैक्षणिक व कृषी विषयक कार्यक्रम प्रात्यक्षिकांसह प्रसारीत करणे, कुटुंब नियोजन विषयक माहिती देणे, निरक्षरता कमी करणे व शिक्षणाचा प्रसार करणे या उद्दीष्टावर दूरदर्शन आपले कार्यक्रम प्रसारीत करीत असे.

आज २१ व्या शतकात दूरदर्शन विविध कार्यक्रम सादर करून लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान होतांना दिसून येत आहे. प्रामुख्याने मनोरंजन, साक्षरता, शिक्षणाचा प्रसार, संगीत, क्रीडा, गाण्यांचे कार्यक्रम, विनोदी कार्यक्रम, चित्रपट, प्राणी व निसर्ग या व इतर विषयावर आपले दर्जेदार कार्यक्रम सादर करीत आहे. या सर्व कार्यक्रमासाठी देशात दूरदर्शन दृक-श्राव्य माध्यम असल्याने ते अत्यंत लोकप्रिय माध्यम झाले आहे. ऐतिहासिक व प्रेक्षणिय स्थळे व घटनांचे चित्रीकरण करून दूरदर्शन भारताच्या कान्याकोपऱ्यात प्रसारण करीत आहे. रंगीत चित्रे, रिमोट, व अनेक वाहिन्या त्यांचे विविध विषयांवरील कार्यक्रम सादर केल्यामुळे दूरदर्शनची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच आहे.

आज भारतात साधारणतः ८० टक्के लोकांपर्यंत दूरचित्रवाणी पोहचली असून खाजगी क्षेत्रातील मनोरंजन व बातम्या देणारी दूरचित्रवाणी वाहिन्या (चॅनल) मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या टी.व्ही. मुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे चांगलेच महत्त्व वाढले. प्रकाश, रंग, संगती, ध्वनी, चित्र, संगीत तसेच रंगीत संच, रिमोटचा वापर व घटनांचे सजीव चित्रण व प्रत्यक्ष प्रसारण व बातम्यांमुळे दूरदर्शन भारतात लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. आज अत्यंत जलद गतीने लोकापर्यंत पोहचण्याचे साधन म्हणून दूरदर्शनकडे पाहिले जाते.

**दूरचित्रवाणी :**

२१ व्या शतकात दूरचित्रवाणीचे महत्त्व व उपयोगीता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. सुरूवातीला शिक्षण आणि माहिती प्रसाराच्या उद्दिष्टाने सुरू झालेली दूरचित्रवाणी आज मनोरंजनाचे सगळ्यात लोकप्रिय साधन झाले असून प्रत्येक घरात दूरचित्रवाणीने भक्कम पाया रोवला आहे.

जगात दूरचित्रवाणीचा शोध लागल्यापासूनचा प्रवास हा प्रगतीचे सर्वच टप्पे पार पाडून यशाच्या शिखरावर पोहचला आहे. त्याचबरोबर जगात मोबाईल धारकांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भविष्यात मोबाईलमध्ये

एरियल-टीव्ही मोबाईल आणि त्या पाठोपाठ इंटरनेटच्या माध्यमातून अवतरीत झालेल्या इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीच्या आगमनाने पुन्हा एका नव्या प्रांतात पाय रोवला आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या नवनवीन शोधामुळे इंटरनेटचे जग विस्तृत झाले आहे. मग ते कोणतेही क्षेत्र असो पूर्वीची वर्तमानपत्रे आता ऑनलाईन झाली आहेत. ई-पेपरचा हा प्रवास या क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा आहे. फारपूर्वी ग्रामोफोनच्या तबकडी द्वारा आकाशवाणी कार्यक्रमाचे प्रक्षेपण करावयाची ते सुद्धा आज ऑनलाईन झाली आहेत. एफ.एम. अथवा वेबसाईट प्रक्षेपण करणारी रेडिओ केंद्रे इंटरनेटने मोठ्या प्रमाणावर विकसित झाली आहेत. अशा परिस्थितीत इंटरनेटच्या माध्यमातून अनेक वाहिन्यांनी त्यांच्या संकेत स्थळावर ऑनलाईन टी. व्ही सुरू केलेले दिसून येत आहे. उद्या हे क्षेत्र विकसित होऊन इंटरनेट प्रोटोकॉल टी.व्ही चे जग असेल एकंदरीतच नवीन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे दूरचित्रवाणीने महत्त्वाचा टप्पा स्विकारला आहे.

टेलिव्हिजन हा शब्द ग्रीक टेलि आणि लॅटीन व्हिजन या दोन भाषेतून तयार झालेला आहे. टेलि TELE या शब्दाचा अर्थ असा की, लांबचे किंवा दूरचे यावरून इंग्रजीत विविध शब्दांचा उदय झाला. उदा. टेलिग्राफ, टेलिफोन, > टेलिप्रिंटिंग, टेलिकास्ट, टेलिग्राम, इ. Vision किंवा Vide चा अर्थ आहे पाहाणे या दोन्ही शब्दांचा संधी होऊन टेलिव्हिजन हा शब्द अस्तित्वात आला. ज्या

माध्यमाद्वारे लांबची अथवा दूरची दृश्ये पाहिली जातात त्याला टेलिव्हिजन असे म्हणतात. मराठी भाषेत त्याला दूरचित्रवाणी असे संबोधले जाते परंतु आताचा टेलिव्हिजनचा प्रचलीत अर्थ म्हणजे आजचे दूरदर्शन असे म्हणावे लागेल.

इ.स. १९२६ मध्ये सर्वप्रथम इंग्लंडमधील जॉन लॉगी बेयर्ड यांनी दूरचित्रवाणी म्हणजे दूरदर्शनचे प्रसारण केले. त्यानंतर १९३२ मध्ये अमेरिकेतील रेडिओ कॉर्पोरेशन या कंपनीने जॉन लॉगी बेयर्ड यांच्या संशोधनाच्या आधारे दूरचित्रवाणीचे व्यवस्थित यंत्रणेद्वारे प्रसारण केले. सुरूवातीला टेलिव्हिजनला Taly आणि त्यानंतर इ.स. १९५० नंतर TV या संक्षिप्त नावानेच T.V जनसामान्यांत ओळखू जाऊ लागला. भारतात १५ सप्टेंबर १९५९ मध्ये एका प्रायोगिक योजनेद्वारे दिल्लीला एक टी. व्ही केंद्र उघडून दूरदर्शनचे प्रसारण रंगीत प्रक्षेपण करू लागले. भारतात इ.स. १९७२ मध्ये १ ले सुनियोजित केंद्र सुरू करण्यात आले. इ.स. १९८२ मध्ये आशियाई क्रिडा स्पर्धांचे प्रक्षेपण तत्कालीन प्रधानमंत्री स्व. इंदिरा गांधी यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आले. पुढे भारतात त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. मनोरंजनाचे मुख्य साधन म्हणून भारतात टी. व्ही घराघरात पोहोचला. १८ मे १९८८ ला राष्ट्रीय वाहिनी म्हणून नियमितपणे प्रक्षेपण सूरू झाले. त्या वर्षात भारतातील ७६ टक्के लोकांपर्यंत हे प्रसारण पोहचत होते. इ.स. १९९० च्या दशकात मात्र दूरदर्शनच्या अनेक खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्यांची सुरूवात झाली. या खाजगी वाहिन्यांची दर्जेदार कार्यक्रम प्रसारित करून स्वतःचा प्रेक्षक वर्ग निर्माण करून लोकप्रियतेचे शिखर गाठले. पुढे CAS म्हणजे कंडीशन ॲक्सेस सिस्टम वापरून केबल ऑपरेटरांना उत्तम पर्याय देण्याचा शासनाचा विचार होता. परंतू डायरेक्ट टू होम DTH च्या आगमनाने ग्राहकांना अत्यल्प खर्चात पन्नासच्यावर वाहिन्या मोफत दिसू लागल्या. आणि आतातर शेकडो चैनल्स T.V वर आपले प्रक्षेपण करून जनतेच्या मनोरंजनात भर घालतांना दिसून येत आहे. संगणक व महाजाल Computer and Internet: इ.स. १८३३ मध्ये अमेरिकेतील चार्ल्स बॅबेज यांनी संगणकाची कल्पना मांडली. इ.स. १९३८ मध्ये १ ला संगणक तयार झाला. तो आकाराने प्रचंड होता. काळानुरूप संगणकाचे तंत्र शास्त्रज्ञांनी विकसित केले. आज संगणक अत्यंत लहान आकारात हाताळायला सहजसोपा असा तयार करण्यात आला. त्यात लॅपटॉप, हाताच्या तळहातावर मावतील असे पामटॉप, आयपॅड सर्वत्र उपलब्ध आहेत. प्रचंड माहिती, सांख्यिकी व इतर सर्व प्रकारची माहिती संगणकामुळे सहजगत्या उपलब्ध होण्याची सुविधा निर्माण झाली आहे. संगणकामुळे जगातील संगणक तंत्रज्ञानामुळे एकमेकांशी जोडल्यामुळे जे जाळे तयार झाले त्याला महाजाल Eternal असे म्हणतात. ही सुरूवात सर्वप्रथम अमेरिकेत झाली. इंटरनेट हा शब्द वर्ल्ड वाईड वेब (WWW) या नावाने ओळखला जातो. वेबसाईटवरील माहितीला पेज असे म्हणतात. महाजालामुळे हवी ती माहिती मिळते, मनोरंजन होते व दुसऱ्याशी थेट संवाद साधता येतो.

जगातील चित्रपट, नाटके, बातम्या, खेळ, नृत्य इ. मनोरंजनाचे कार्यक्रम पाहता येतात. त्याचबरोबर चॅटिंग, कॉन्फरसिंग, ई टपाल, फॅक्स, ब्लाग, फेसबुक, वॉटसअॅप या माध्यमातून थेट संवाद साधता येतो हे केवळ इंटरनेटमुळे साध्य झाले. त्यामुळे मानवी जीवनात इंटरनेटचे महत्त्व अधिक आहे.

**ई टपाल :**

संदेश-टपाल वहन करणारी ई-टपालसेवा ही जगातली अति जलद व अत्याधुनिक मानली गेलेली टपाल सेवा आहे. ही जीमेल, हॉटमेल, याहू मेल, रेड अफ् एम मेल इ. द्वारे संगणकाच्या व इंटरनेटच्या सहाय्याने पुरविली जाते.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमांची इतिहासातील उपयोगिता :**

इतिहास विषयाच्या संदर्भात इलेक्ट्रॉनिक माध्यमांची उपयोगिता अतिशय महत्त्वपूर्ण बाब ठरत आहे. ती पुढील कारणांमुळे –

१) इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे ऐतिहासिक ठिकाणांचे घटनांचे थेट प्रक्षेपण करता येते.

२) इतिहासाच्या साधनांचे जतन आणि संवर्धन करण्यात उपयुक्त ठरते. ३) ऐतिहासिक दृष्य महत्त्वपूर्ण कागदपत्रे, शिल्पे, स्मारके, अवशेष, यांचे चित्रीकरण करून साधनांचे जतन करता येते.

४) या इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी नोंदविलेल्या घटनांच्या आधार इतिहास लेखनात करता येतो.

५ ) देश-विदेशातील ऐतिहासिक घटना स्मारके, वास्तुशिल्पे यांची माहिती मिळते.

**विजाणु शास्त्रीय माध्यमांची उपयुक्तता :**

विजाणु शास्त्रीय माध्यमे ही मुद्रीत माध्यमांपेक्षा अधिक प्रभावी व उपयुक्त असून एकाचवेळी सर्वांना संदेश देण्याचे व मिळविण्याचे अत्यंत उपयुक्त साधन आहे. या माध्यमामुळे जगाच्या कुठल्याही भागातील घटना त्वरेने सर्व जगात पोहचते. त्याचप्रमाणे ज्ञान-विज्ञानाचा प्रसार वेगाने होतो त्यामुळे जगभरात एकमेकांशी जोडल्यामुळे जे जाळे तयार झाले त्याला महाजाल Enternal असे म्हणतात. ही सुरूवात सर्वप्रथम अमेरिकेत झाली. इंटरनेट हा शब्द वर्ल्ड वाईड वेब (WWW) या नावाने ओळखला जातो. वेबसाईटवरील माहितीला पेज असे म्हणतात. महाजालामुळे हवी ती माहिती मिळते, मनोरंजन होते व दुसऱ्याशी थेट संवाद साधता येतो.

जगातील चित्रपट, नाटके, बातम्या, खेळ, नृत्य इ. मनोरंजनाचे कार्यक्रम पाहता येतात. त्याचबरोबर चॅटिंग, कॉन्फरसिंग, ई टपाल, फॅक्स, ब्लाग, फेसबुक, वॉटसअॅप या माध्यमातून थेट संवाद साधता येतो हे केवळ इंटरनेटमुळे साध्य झाले. त्यामुळे मानवी जीवनात इंटरनेटचे महत्त्व अधिक आहे.

**ई टपाल :**

संदेश-टपाल वहन करणारी ई-टपालसेवा ही जगातली अति जलद व अत्याधुनिक मानली गेलेली टपाल सेवा आहे. ही जीमेल, हॉटमेल, याहू मेल, रेड अफ् एम मेल इ. द्वारे संगणकाच्या व इंटरनेटच्या सहाय्याने पुरविली जाते.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमांची इतिहासातील उपयोगिता :**

इतिहास विषयाच्या संदर्भात इलेक्ट्रॉनिक माध्यमांची उपयोगिता अतिशय महत्त्वपूर्ण बाब ठरत आहे. ती पुढील कारणांमुळे –

१) इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे ऐतिहासिक ठिकाणांचे घटनांचे थेट प्रक्षेपण करता येते.

२) इतिहासाच्या साधनांचे जतन आणि संवर्धन करण्यात उपयुक्त ठरते.

३) ऐतिहासिक दृष्य महत्त्वपूर्ण कागदपत्रे, शिल्पे, स्मारके, अवशेष, यांचे चित्रीकरण करून साधनांचे जतन करता येते.

४) या इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी नोंदविलेल्या घटनांच्या आधार इतिहास लेखनात करता येतो.

५ ) देश-विदेशातील ऐतिहासिक घटना स्मारके, वास्तुशिल्पे यांची माहिती मिळते.

**विजाणु शास्त्रीय माध्यमांची उपयुक्तता :**

विजाणु शास्त्रीय माध्यमे ही मुद्रीत माध्यमांपेक्षा अधिक प्रभावी व उपयुक्त असून एकाचवेळी सर्वांना संदेश देण्याचे व मिळविण्याचे अत्यंत उपयुक्त साधन आहे. या माध्यमामुळे जगाच्या कुठल्याही भागातील घटना त्वरेने सर्व जगात पोहचते. त्याचप्रमाणे ज्ञान-विज्ञानाचा प्रसार वेगाने होतो त्यामुळे जगभरात शिक्षणाचा प्रसार वेगाने होत आहे. तसेच माहिती व मनोरंजनाचे मुख्य साधन म्हणून उपयुक्त आहे.

विद्युत माध्यमेही अधिक उपयुक्त आणि प्रभावी असून विद्युत माध्यमे दृकश्राव्य माध्यमे आहेत. या माध्यमामुळे स्थळांचे व घटनांचे थेट प्रक्षेपण करता येते. त्याचप्रमाणे ऐतिहासिक साधनांचे जतन व संवर्धन चांगल्या प्रकारे करता येते. ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची कागदपत्रे, साधने, मूर्ती, अवशेष, स्मारके, वास्तू, किल्ले, वाडे, गढ्या, मंदिरे, यांचे चित्रीकरण व फोटो कॉपी करून साधनांचे रक्षण व जतन करता येत. तसेच या कागदपत्रांचे अतिशय कमी जागेत जतन व संवर्धन करता येते. तसेच विद्युत माध्यमांनी नोंदवलेली घटना ही व्यक्ती, ठिकाण, काळ व घटना या चतुःवेधनांनी परिपूर्ण असते. या सर्व कारणांमुळे विजाणु शास्त्रीय माध्यमांची उपयुक्तता ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची ठरते.